Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal    Impact Factor 5.98
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# भारतीय समाजातील आद्य आणि कर्तवगार स्त्रिया: एक दृष्टीक्षेप

**डॉ . साईनाथ राधेशाम बनसोडे**
सहयोगी प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग प्रमुख
महिला कला महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

**सारांश**

भारतीय समाजाच्या प्रगतीत अनेक आद्य आणि कर्तबगार स्त्रियांनी मोलाची भूमिका बजावली आहे. यात अनेक थोर महिलांनी शिक्षण,समाजसुधारणा,क्रीडा,राजकारण आणि स्वातंत्र्यलढ्यात पायंडे पाडले. या स्त्रियांनी रूढी-परंपरा मोडून शिक्षणाची व समतेची कवाडे खुली केली आणि भारतीय समाजात स्त्रियांना सन्मानजनक जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित केले.

## प्रस्तावना

आधुनिक काळात आज स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटवित आहेत. त्यांनी सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, क्रीडा इत्यादी अनेक क्षेत्रात स्त्रियांनी आपले नाव लौकिक केले आहेत. तो भारतीय समाज असो किंया जागतिक. स्त्रियांनी आपल्यामधील स्व विषयक जाणीव जागृत करुन घेतलेली आहे. जेथे स्त्रियांचे कार्यक्षेत्र केवळ चूल व मूल मानले जात होते त्या क्षेत्राला स्त्रियांनी झुगारुन समाजात एक नवे पाऊल टाकले. जेथे स्त्रियांना दुय्यम स्थान होते तेथेच स्त्रिया आज पुरुषाच्या खांद्याला खांद्या लावून कर्तृत्व बजावतांना आपणाला विविध क्षेत्रात दिसतात.

**स्त्रियश्चरित्रम् पुरुष्य भाग्यम् । देवो न जानाती कुतो मनुष्यः ।**

या सुभाषिताप्रमाणे स्त्री किंवा पुरुष म्हणून जन्माला येणे हा प्रत्येकाच्या नशीबाचा भाग असतो. पण म्हणून यातलें कोणी महत्वाचे वा कोणी कमी महत्वाचे असे होऊ शकत नाही आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात चमकत आहेत. मुलींना आज संपूर्ण स्वातंत्र्य असून प्रत्येक क्षेत्रात आपल्या कुवतीप्रमाणे करीअर करताना दिसतात. अशाच स्त्रियांचा आढावा प्रस्तुत निबंधात घ्यायचा आहे की,ज्यामुळे भारतीय समाज विकासाच्या वाटेने जाऊन महिलांना मुक्तपणे जीवन जगता येईल.

## संशोधानाची उद्दिष्टे :

१. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासात त्यांचे योगदान स्पष्ट करणे.

२. सामाजिक परिवर्तनाच्या हेतूने त्यांच्या व्यक्तिमत्याचे विविध पैलू पाहणे.

३. भारतीय समाजातील आद्य स्त्रियांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेणे,

४. आधुनिक कालखंडातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्त्रियांची माहिती प्राप्त करुन घेणे.

**संशोधान अभ्यासाचे महत्व :**

भारतीय समाजातील कर्तबगार स्त्रियांचा अभ्यास करुन इतर स्त्रियांना प्रोत्साहित करुन त्यांच्यात आत्मबळ निर्माण करुन स्त्रियांवर होणा-या अन्यायाविरुध्द जागृती करुन देणे हा महत्वाचा उद्देश्य आहे.

**१) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले-युगस्त्री**

स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक म्हणून सावित्रीबाई फुले यांची संपूर्ण भारतीय समाजात ओळख आहे. सावित्रीबाई एक बुध्दिमान लेखिका व प्रतिभासंपन्न कवयित्री होत्या. स्त्री शक्ती जागृत केल्याशिवाय स्त्री मुक्ती शक्य नाही हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले आणि म्हणूनच सावित्रीबाई या भारतातील स्त्री मुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या होत. महात्मा फुलेंनी सन १८४८ मध्ये पुण्यातील भिडेवाड्यात पहिली मुलींची शाळा काढून त्या शाळेत सावित्रीबाई शिक्षिका बनविले. सावित्रीबाईनी मुलींना शिकविण्याचे कार्य अविरत केले. अशा या सावित्रीबाईकडे आद्य स्त्री शिक्षिका होण्याचा मान जातो. त्यातच सावित्रीबाई फुले हे बहुजनाच्या आदर्श माता, कर्त्यासुधारक, साहित्यिक, व्यक्तिमत्व, कणखरपणा, खंबीर नेतृत्व व आदर्श पत्नी यासारख्या गुणांनी त्या परिपूर्ण होत्या.

**२) ताराबाई शिंदे-धाडसी स्त्री**

भारतीय समाजातील मराठीतील पहिल्या स्त्री समीक्षक म्हणून ताराबाई शिंदे यांची ओळख आहे. स्त्री पुरुष समान आहेत ही ताराबाईची भूमिका होती. पुरुषी वर्चस्वाला, दुटप्पीपणाला, ढोगीपणाला आव्हान देऊन त्यांचा बुरखा फाडणारी पहिली स्त्री अशी ताराबाई शिंदे यांची विशेष ओळख आहे. स्त्रियांनी काही लिहिणे सुध्दा अपवादात्मक असण्याचा तो काळ होता पुरुष व्यवस्थेविरोधात आवाज उठवावा हे साहस वाटते तितके सोपे नव्हते पण ताराबाईनी त्याला वाचा फोडली. ताराबाई पुरुषावर सडेतोड टीका करत असल्या तरी त्या पुरुषद्वेषा नव्हत्या. स्त्री पुरुष समान आहे ही त्यांची भूमिका होती. स्त्री पुरुषामधील असंतुलन समाजासमोर आणायचे होते. स्त्री-पुरुष या दोन्हीं जातींनी एकमेकांना समजून घ्यावे त्यांच्यात एकोपा निर्माण व्हावा, हेच त्यांचे स्वप्न होते. स्त्रियांचे दोष शिक्षणाच्या सामाजिक शोध अभावामुळे पुरुषांच्या त्यांना मोहात पाडण्याच्या वृत्तीमुळे येतात असे त्याचे म्हणणे असे. स्त्रियांना या अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी त्यांनी लिहिलेल्या निबंधातील बोल आजही खणखणीतपणे ऐकू यावेत इतके ताजे वाटतात. त्यांच्या या निबंधातून त्यांची साहित्यिक जाण ही प्रगल्भअसल्याने मराठीतील पहिली स्त्री समीक्षक होण्याचा मानही त्यांनाच मिळतो.

**३) पंडिता रमाबाई**

अनाथ स्त्रियांचा उध्दार हे पंडिता रमाबाई यांनी आपले जिवित कार्य मानले होते. त्यासाठी निरनिराळ्या संस्थाच्या माध्यमातून त्यांनी कार्य केले. अनेक भाषांचे ज्ञान घेऊन स्त्रियांच्या जीवनावर विविध ग्रंथ लिहिले. भारतीय समाजातील स्त्रियांचे विधयेचे जगणे महाभयंकर होते. डोळे असून पाहता येत नाही, कान असून ऐकता येत नाही, कसायाप्रमाणे विधवेचे केशवपन करत, नात शोभेल अशा स्त्रीशी लग्न करणे अशी स्थिती होती. रमाबाईनी या सर्वांना खीळ घातली आणि विधवासाठी कार्य करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या

**४) आनंदीबाई जोशी-स्वयंसिध्द**

१९व्या शतकात स्त्री शिक्षण परदेशगमन ही समाजाच्या दृष्टीने महापाप होते अशा प्रतिकूल वातावरणात संघर्ष करत परदेशात उच्च शिक्षण घेवून आणि डॉक्टर ऑफ मेडिसीन (MD) ही पदवी मिळवून डॉक्टर आनंदीबाई जोशींनी भारतीय स्त्री शिक्षणाच्या इतिहासात पहिल्या महिला डॉक्टर म्हणून एक विक्रम नोंदवला.

**५) इंदिरा गांधी-प्रियदर्शिनी**

भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा मान इंदिराजींना मिळाला. खंबीरपणा, नेतृत्व, आत्मविश्वास, आपुलकी असे सगळेच गुण एकत्रित दिसतात ते इंदिरा गांधीकडे. भारतीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकारणात्त स्वतःचा ठसा उमटवणाऱ्या इंदिरा गांधी यांना तहस्त्रकातील अत्यंत प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जाते. अर्थातच त्यामागे होती, त्यांची लोककल्याणाची आवड. त्याचबरोबर त्या स्त्रियांचे नेहमी प्रबोधन करायच्या. त्यांच्या कारकिर्दीबद्दल त्यांना असंख्य पुरस्कार मिळाले. पण सर्वोच्च पुरस्कार होता तो १८ डिसेंबर १९७१ रोजी भारताने त्यांना बहाल केलेला भारतरत्न किताब. १९६७ मध्ये झालेल्या निवडणुकीत देशाच्या पहिल्यामहिला पंतप्रधान झाल्या.

**६) अरुंधती रॉय -बंडखोर लेखिका**

बुकर हा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा सन्मान प्राप्त करणारी पहिली भारतीय महिला म्हणजे अरुंधती रॉय होय. जुळया भावंडाचं कौटुंबिक भावविश्व सामाजिक राजकीय परिस्थितीतील गुंतागुंतीमुळे कशा प्रकारे उध्वस्त होते. याचे अतिशय जिवंत चित्र त्यांच्या 'गॉड ऑफ स्माल थिंग्ज' या कांदबरीमध्ये मांडले त्यांच्या पहिल्याच कादंबरीला आंतरराष्ट्रीय ख्यातीचा बुकर पारितोषिक मिळाला. याशिवाय अनुस्फोट चळवळ, नर्मदा बचाव आंदोलन, यामध्येही सक्रीय सहभाग घेतला.

**७) सरोजीनी नायडू-स्वातंत्र्य सेनानी**

जागतिक साहित्यिक क्षेत्रात आपला आगळा-वेगळा ठसा उमटवणाऱ्या सरोजीनी नायडू यांनी वयाच्या ११व्या वर्षापासूनच कविता लेखनाला सुरुवात केली होती. परंतु त्यांची खरी ओळख ठरली ती स्वातंत्र्य सेनानी म्हणून. काँग्रेस अधिवेशनाच्या अध्यक्षा व पहिल्या महिला राज्यपाल म्हणून त्यांची उत्तर प्रदेशमध्ये झालेली नियुक्ती हे त्यांच्या राजकीय जीवनातील महत्वाचे टप्पे आहेत. थोर कवी, स्वातंत्र्यसेनानी असलेल्या सरोजीनी नायडू यांनी सामाजिक कार्याला सुरुवात केली ती स्त्रियांच्या अधिकाराच्या पुरस्कर्त्या म्हणून महिलांच्या हक्कासाठी त्या खूप झगडल्या देशाची सेवा करण्याच्या भावनेने त्यांनी स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेतला आणि सेनानी म्हणून ओळखल्या जाऊ लागल्या.

**८) सुचेता कृपलानी- कार्यकुशल**

भारत देशातील पहिल्या मुख्यमंत्री म्हणून सुचेता कृपालानी यांची ओळख आहे. भारतीय राज्यघटना तयार करण्यासंबंधीच्या कामासाठीही त्या निवडल्या गेल्या होत्या. १५ ऑगस्ट १९४७मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यावर 'वंदे मातरम्' हे गीत गाण्याचा मान त्यांना मिळाला. सुचेता कृपलांनी यांनी मिळालेल्या पदाचा अतिशय कुशलतेने आणि प्रामाणिकपणे वापर केला. त्यांनी महिलांचे अनेक प्रश्न सोडविले. व्यक्तिशः भेटून त्या महिलांच्या समस्या सोडवत असत.

९) फातिमा बीवी-निर्णयक्षम

फातिमा बीबी यांना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश म्हणून ओळखलं जातं. तसेच सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती झालेल्या पहिल्या मुस्लीम म्हणूनही त्यांची ओळख आहे. एकूणच एवढ्या उच्च पदावर नियुक्ती झालेली पहिली मुस्लीम महिला, अशी स्त्री मुक्तीच्या अभ्यासकांनी त्यांची नोंद केली आहे. कनिष्ठ न्यायालय ते सर्वोच्च न्यायालय आणि ते पण राज्यपाल पद असा फातिमा बीवींच्या कार्याचा प्रवास आहे. या प्रवासात प्रामुख्याने जाणवते, ती त्याची निर्णयक्षमता.

१०) मदर तेरेसा-योगिनी

**'क्षमेशिवाय खरे प्रेम असूच शकत नाही'**, असा संदेश देणाऱ्या मदर तेरेसा या साऱ्या दुनियेच्या माता बनल्या. त्यांना अनेक राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले. मदर तेरेसा ह्या भारतातील पहिल्या महिला नोबेल पारितोषिक विजेत्या ठरल्या भारतातील सेवा कार्यात आपल्याला पाठवावे अशी इच्छा अग्नेस या अठरा वर्षीय युवतीने व्यक्त केली. आयुष्यभर गरीबाची सेवा करणाऱ्या मदर तेरेसा म्हणजेच ही युवती. अग्नेस होय. मदर तेरेसा या धार्मिक वृत्तीच्या होत्या. त्यांनी आपल्या संघटनेचा व्याप वाढवून अनेक संस्था उभ्या केल्या, दीन, दुबळया, अपंग, दलित, निराधार, परित्यक्त्या अशा अनेक स्त्रियांचा त्या आधार बनल्या, मदर तेरेसा यांच्या कार्याने अनेक महिलांना आपल्या कार्याची, समाजसेवेचे महत्व समजले.

११) प्रतिभाताई पाटील- पहिल्या महिला राष्ट्रपती

स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून प्रतिभाताई पाटील शेखावत म्हणून यांची ओळख आहे. अध्यापनाकडे ओढा असणाऱ्या प्रतिभाताई राजकारणाकडे वळल्या. निष्ठेने काम करत कार्यकर्ती, मंत्री राज्यपाल असा त्यांचा प्रवास राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचला. महाविद्यालयीन काळापासून त्या कर्तबगार होत्या. प्रतिभाताईच्या विचारशील, नियोजनबध्द व गौरवपूर्ण कारकिर्दीची छाप नव्या पिढीतील राजकीय महिला नेतृत्वावर नक्कीच राहील.

११) कल्पना चावला-महिला अंतरावीळ

"I was not born for one corner. The whole world is my native land." अंतराळातून खाली पृथ्वीकडे बघताना कल्पना चावला यांनी उच्चारलेले हे शब्द। त्यांचे हे शब्दच त्यांच्यासारख्या असंख्य ध्येय वेडया तरुणींची प्रेरणा बनले. अमेरिकेच्या अवकाश मोहिमांमधून दोन वेळा अंतराळात झेपावणारी भारतीय वंशाची पहिली स्त्री, अशी त्यांची नोद झाली. अंतराळात जाण्याचे कल्पना चावला यांचे स्वप्न होते. आपलं स्वप्न पूर्ण करण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. अंतराळात जाण्याची संधी त्यांना दोन वेळा मिळाली. भारतीय कन्या म्हणून आपली ओळख अखेरपर्यंत त्यांनी प्जपली. कल्पना चावला यांची कामगिरी भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट बनली. त्यांनी एक स्वप्नं पाहिलं आणि ते पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यामुळेच त्या असंख्य भारतीय
मुलींची प्रेरणा बनल्या.

**१२) डॉ किरण बेदी-तडफदार**

भारतीय समाजातील पहिल्या महिला आयपीएस अधिकारी म्हणून त्यांना बहुमान मिळाला. घडाडी म्हणजे काय याचे उदाहरण म्हणजेच किरण बेदी. प्रामाणिकपणे आपली कारकीर्दपूर्ण करणाऱ्या या आयपीएस अधिकाऱ्याची ओळख खंबीर आणि तडफदार नेतृत्व अशी आहे. किरण बेदींनी आपल्या क्षेत्रात खूपच चांगली कामगिरी केली. त्यांनी आपला आदर्श सर्व पोलिस अधिकारी व कर्मचारी यांना दाखवून दिला आहे. स्त्रियांनी कोणतीही मिती मनात न ठेवता सर्वध क्षेत्रात आवर्जून भाग घ्यावा असं त्यांचं ठाम मत आहे. किरण बेदींना त्यांच्या कार्याबद्दल अनेक पुरस्कार मिळाले. किरण बेदींनी विशेषतः लोकाभिमुख कार्य केले. स्त्रियांचे प्रश्न, तुरुंग सुधारणा, अंमली पदार्थ, दुष्परिणाम, तस्करी रोखणे, यावर व अशा अनेक प्रश्नावर आशियाई देशांत व संयुक्त राष्ट्रसंघात असलेल्या परिषदांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले.

**१२) पी.टी. उषा-सुवर्णकन्या**

जागतिक पातळीवर ज्या काही महिलांनी भारताचे नाव उंचावले त्यामध्ये पी.टी. उषाचे नाव ठळकपणे झळकते. १९८६ हे वर्ष म्हणजे भारतासाठी नवा अध्याय लिहिणारे ठरले. तोपर्यंत भारताला जे यश माहीत नव्हते, ते उषाने मिळवून दिले. तब्बल चार सुवर्णपदके पटकावून उषा सुवर्णकन्या झाली. जिद्द, निर्धार आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर सुवर्णमय कारकिर्द उभारली. त्यामुळे तिला केरळ सरकारने दिलेल्या तीस एक्कर जागेत उषाने सुरु केलेल्या स्कूलमधून उद्याच्या भारताला असंख्य उषा तयार होतील हा विश्वास मिळतो.सामाजिक शोध

**१३) शितल महाजन-जंपिग गर्ल**

दोन्ही ध्रुवावर पॅराजंपिग करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या दोन्ही ध्रुवावर शुन्याच्या खाली तापमान असूनही एक वेगळेच जग, सगळीकडे बर्फ, अशा ठिकाणी हवेतून उडी घेण्याची कल्पना ही अंगावर काटा आणणारी आहे. मात्र अंगभूत घाडस असेल, अंगी धैर्य असेल तर कांहीही करता येते. उत्तर ध्रुवावर त्यांनी पैराशूटमधून जंप घेतली, तर दक्षिण ध्रुवावर त्यांनी ॲक्सीलरेटेडाफ्री फॉल अशी जंप घेतली. उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव अशा दोन्ही ठिकाणी पॅराजंपींग करुन शीतल यांनी देशाची मान उंचावली. त्यांच्यासह त्यांच्या कर्तृत्वानेही आसमानात झेप घेण्यासारखीच ही घटना आहे. प्रत्येकाला संधी मिळते. संधीचा फायदा उठवावा आणि असाध्य गोष्ट साध्य करून दाखवावी असे त्या तरुण पिढीला सुचवतात.

**१४) सानिया मिर्झा-उत्तम खेळाडू**

टेनिस या क्रीडा प्रकारातील अव्वल दर्जाची खेळाडू म्हणून सानिया मिझर्भाचे नाव सर्वाना सुपरिचीत आहे. फेब्रुवारी २००५ मध्ये डब्ल्यु.टी.ए. सींगल टेनिस स्पर्धा जिंकणारी ती भारतीय महिला ठरली. २००६ च्या दोहा आशियाई खेळामध्ये तिला रौप्य आणि दुहेरी सामन्यात सुवर्णपदक मिळाले. सानिया मिर्झाच्या या कर्तबगारीमुळे भारतीय तरुणीना प्रोत्साहन मिळते.

**१५) सायना नेहवाल- ऑलिम्पिक पदक बॅडमिंटनपटू**

ऑलिम्पिक पदक पटकावणारी ती पहिली भारतीय बॅडमिंटनपटू ठरली. याचबरोबर सायनाने भारतीय इतिहासात नवा अध्यायही लिहिला. २०१२ च्या ऑलिम्पिकमध्ये कास्यपदक पटकावले. २००६ मध्ये १६ व्या वर्षी फिलीपाईन्स ओपनचीही फास्ट स्टार स्पर्धा जिंकली.

**निष्कर्ष :**

प्रस्तुत निबंधात भारताच्या जडण-घडणीमध्ये आणि विकासामध्ये महिलांनी निश्चितच महत्वाचे योगदान दिले आहे. स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रांतून आज भारतीय समाजातील स्त्रियांचे नाव लौकिक आहे. त्यामूळेच विकासाच्या दिशेने स्त्रियांनी पावले टाकली आहेत. म्हणूनच आज भारतातील प्रत्येक महिला ही आपल्या कर्तृत्वाने मोठी झाली आहे व स्वच्छंदपणे आणि मुक्तपणे मोकळा श्वास घेत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ सूची:-**

१) क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. मा.गो. माळी
२) स्त्री-पुरुष तुलना, ताराबाई कला
३) कर्तृत्वशालीनी, प्रतिमा गोपूजकर, श्री विद्या प्रकाशन
४) तनिष्का, सप्टेंबर २००८
५) पुर्वाक्त
६) विकिपीडीया
७) राहुल तिरसे आणि गौरी मराठे, लंडन ऑलिम्पिक आणि भारतीय चाणक्य मंडळ, अंक ८-२०१२
८) भारतीय स्त्री जीवन, गीता साने